# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-१४९ दिनांक - १९/०४/२०२४

## डेबिट कार्ड व क्रेडिट कार्ड चोरी करुन त्यातुन खरेदी करुन ४,०४,०००/- रुपयाची फसवणुक करणाऱ्या आरोपी पकडण्यास भाईंदर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

भाईंदर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हा रजि क्र - १५०/२०२४ भा.द.वि.स. कलम-३७९,४२० प्रमाणे गुन्हा नोंद असुन गुन्हयाची हकीगत अशी की, फिर्यादी नामे अमीत हरनारायण अग्रवाल वय ४४ वर्षे व्यवसाय –कुरिअर रा.ठी. बी/विंग, रुम नं १६०१, इंद्रप्रस्थ न्यु गोल्डन नेस्ट, फेस १६, भाईदर पुर्व. यांनी समक्ष पोलीस ठाणेस येवुन कळविले की, दि. ३१/०३/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा. फिर्यादी राहत असलेल्या इंद्रप्रस्थ बिल्डींगची मॅच असल्याने तो ब्लुवपिंच टर्फ, भाईदर पश्चिम या ठिकाणी क्रिकेटचे सामने खेळण्याकरीता गेला असता त्याचेकडिल बॅग कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादि याचे संमती शिवाय चोरी करुन त्यातील डेबिट कार्ड व क्रेडिट कार्ड वरुन एकुण ४,०४,०००/- रुपायाचे ट्रान्झेक्शन केले आहे म्हणुन त्यांनी पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिल्याने सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

तपासा दरम्यान गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट देवुन गुन्हयाच्या घटनास्थळाचे, घटनास्थळाकडे येणाऱ्या-जाणाऱ्या रस्त्याचे तसेच अंधेरी पुर्व येथील उपलब्ध सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज तपासले असता, त्यात एक संशयित इसम दिसुन आला. घटनास्थळ व इतर ठिकाणचे तांत्रिक विश्लेषन करुन त्या आधारे गुन्हयाचा पुढील अधिक तपास केला असता सदर आरोपी हा फरीदाबाद राज्य हरीयाणा येथील असल्याचे निष्पन्न झाले होते. सदरचा गुन्हा हा आरोपी नामे व्टिंकल अर्जुन अरोरा, वय-३४ वर्षे रा. बी/१६५, स्ट्रीट न. २२, भिकम कॉलनी, ता.जि. फरिदाबाद, राज्य हरीयाणा असे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सदर आरोपी याचा वरील परिसरात शोध घेतला असता नमुद आरोपी हा हाऊस न. १४९५, सेक्टर ७इ, ता.जि. फरिदाबाद, राज्य हरीयाणा. येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचाकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास वर नमुद गुन्हयात दि.१६/०४/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी याचाकडे पोलीस कोठडी दरम्यान तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हया व्यतिरीक्त इतर पोलीस ठाणे हददीत इतर तीन ठिकाणी देखील चोरीचे फसवणुकिचे गुन्हे केले असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले.

**<u>अटक आरोपी याचाकडे तपास करुन उघकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे-</u>**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र व कलम |
|---|---|---|
| १ | भाईंदर पोलीस ठाणे | गु.र.क्र - १५०/२०२४ भा.द.वि.स कलम-३७९,४२० |
| २ | आझाद मैदान पोलीस ठाणे बृहनमुंबई शहर | गु.र.क्र - १३६/२०२४ भा.द.वि.स कलम ३७९,४१९,४२० माहिती तंत्रज्ञान अधि. ६६(सी), ६६(ड) |
| ३ | अंधेरी पोलीस ठाणे बृहनमुंबई शहर | गु.र.क्र - १५१/२०२४ भा.द.वि.स कलम ३७९,४१९ माहिती तंत्रज्ञान अधि. ६६(सी), ६६(ड) |
| ४ | बांद्रा पोलीस ठाणे बृहनमुंबई शहर | गु.र.क्र - १५१/२०२४ भा.द.वि.स कलम ३७९ माहिती तंत्रज्ञान अधि. ६६(सी), |

पोलीस कोठडी दरम्यान सदर गुन्हयातील अटक आरोपी याचा पुर्व अभिलेख तपासला असता सदर आरोपी याचावर खालीलप्रमाणे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

**<u>अटक आरोपी याचा पुर्व गुन्हे अभिलेख खालीलप्रमाणे-</u>**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र व कलम |
|---|---|---|
| १ | वसंत विहार पोलीस ठाणे, दिल्ली | गु.र.क्र - ४६५/२०१६ भा.द.वि.स कलम-३८०,४११ |
| २ | वसंत विहार पोलीस ठाणे, दिल्ली | गु.र.क्र - १००७/२०१६ भा.द.वि.स कलम-३८० |
| ३ | वसंत विहार पोलीस ठाणे, दिल्ली | गु.र.क्र - २६०/२०१६ भा.द.वि.स कलम-४१९,४२०,३८० |
| ४ | बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर | गु.र.क्र - ८६/२०२२ भा.द.वि.स कलम- ४२०,३७९ |

सदरची कामगिरी प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, दिपाली खन्ना, सहा.पो.आयुक्त, भाईंदर विभाग, सुर्यकांत नाईकवाडी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भाईंदर पोलीस ठाणे, विवेक सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउनि/प्रसाद गोवले, पोहवा-०६२९७/रविंद्र भालेराव, पोहवा-०७१२०/राजेश श्रीवास्तव, पोहवा-०७१४५/किरण पी. पवार, पोहवा-०९००४/ किरण आर. पवार, पोहवा-१२१३९/सुशिल पवार, पोना-९७०१०/रामनाथ शिंदे, पोशि-१००३८/संजय चव्हाण, पोशि-१२१२३/सलमान पटवे यांनी केलेली आहे.

-------------------oo--------------------